


दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**

नेहमी लक्षात ठेवा...
तुमचे यशस्वी होण्याचे संकल्प
हे कोणत्या ही इतर संकल्पा पेक्षा
अधिक महत्वपूर्ण आहे...
– अब्राहम लिंकन

वर्ष : ०५ | अंक : २४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०८ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056




## तब्बल ३५ तासांनंतर लालबागच्या राजाचं विसर्जन !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, मुंबई :** मुंबईचा प्रसिद्ध लालबागचा राजा चं अखेर ३५ तासांनी विसर्जन झालं आहे. गिरगावच्या खोल समुद्रात राजाचं विसर्जन करण्यात आलं. यावेळी भाविक आणि मंडळ कार्यकर्ते अत्यंत भावूक झाले होते. आज सकाळी आठ वाजता लालबागचा राजा हा गिरगाव चौपाटीवर दाखल झाला. मात्र, काही तांत्रिक अडचणींमुळे बाप्पा हे त्या तराफ्यावर विराजमान झालेच नाही. त्यातच समुद्राला भरती आल्याने पाण्याची पातळीही वाढली होती. त्यामुळे बाप्पाला तराफ्यावर चढवता येत नव्हतं. मात्र, अथक प्रयत्नांनंतर अखेर ३५ तासांनंतर राजाचं विसर्जन पार पडलं.

२२ तासांच्या मिरवणुकीनंतर लागबागचा राजा गिरगाव चौपाटीवर पोहोचला. तेव्हा राजाला तराफ्यावर चढवून आरती हणार होती. त्यासाठी हजारोंचा जनसमुदाय गिरगाववर लोटला होता. मात्र, तराफ्यावर चढवण्यात यश आलं नाही. तराफा नवीन असल्याने त्यावर बाप्पाला कसं चढवावं याचं नियोजन चुकलं, त्यातच भरतीची वेळ असल्याने पाणी वाढलं होतं. त्यामुळे तराफा स्थिर राहू शकत नव्हता. तब्बल दोन तास बाप्पाला तराफ्यावर घेण्याचे प्रयत्न झाले, मात्र ते शक्य झालं नाही. अखेर, पाणी कमी झाल्यानंतर बाप्पाला तराफ्यावर चढवण्याचा निर्णय घेण्यात आला. तेव्हापासून जवळपास आठ –साडे आठ तास बाप्पा हा पाच फूट पाण्यात होता.

पाणी ओसरल्यानंतर तब्बल साडे आठ तासांनी बाप्पाची मूर्ती तराफ्यावर चढवण्यात यश आलं, तेव्हा 'गणपती बाप्पा मोरया, मंगल मूर्ती मोरया', 'ही शान कोणाची, लालबागच्या राजाची'... या जयघोषांनी सारा परिसर दुमदुन गेला. लालबागच्या राजाला तराफ्यावर चढवल्यानंतर पुन्हा काही काळ प्रतीक्षा करण्यात आली. रात्री ८ वाजून १० मिनिटांनी राजाची आरती करण्यात आली आणि त्यानंतर ९ वाजून १२ मिनिटांनी शास्त्रशुद्ध पध्दतीने अरबी समुद्रात बाप्पाचं विसर्जन करण्यात आलं.

**पुढच्या वर्षी लवकर ये म्हणत लालबागच्या राजाला निरोप**

साश्रू नयनांनी भक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला आहे. यावेळी भाविकांची तुफान गर्दी गिरगाव चौपाटीवर झाली होती. आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी भाविकांचा अलोट जनसागर उसळला होता. बाप्पाची अखेर झलक पाहण्यासाठी कालपासून गिरगाव चौपाटीवर भाविकांनी गर्दी केल्याचं दिसून आलं.



तब्बल २२ तासांच्या भव्य मिरवणुनंतर लालबागचा राजा हा सकाळी आठच्या सुमारास गिरगाव चौपाटीवर पोहोचला. ६ सप्टेंबरला सकाळी दहा वाजता बाप्पा आपल्या मंडपातून बाहेर पडला होता. यावेळी लालबागच्या राजाच्या विसर्जनासाठी खास तराफा तयार करण्यात आला होता. हा तराफा अत्याधुनिक तराफा होता. हा तराफा गुजरात येथून आणण्यात आला होता. हा स्वयंचलित तराफा होता, जो खोल समुद्रात बाप्पाला नेण्यासाठी तयार करण्यात आला होता.

**लालबागच्या राजासाठी विशेष तराफा...**

लालबागच्या राजा मंडळाकडून यावर्षी बाप्पाच्या विसर्जनासाठी हा विशेष तराफा तयार करण्यात आला होता. हा स्वयंचलित तराफा गुजरातमधून तयार करण्यात आला होता. हा तराफा खासकरुन बाप्पाच्या विसर्जनासाठी तयार करण्यात आला होता.

**२२ तास लालबागच्या राजाची मिरवणूक...**

काल लालबागचा राजा सकाळी दहा वाजता आपल्या मंडपातून बाहेर पडला. त्यानंतर लाखो भक्तांसह बाप्पाची भव्य विसर्जन मिरवणूक निघाली. ढोल ताशांच्या गजरात बाप्पाची विसर्जन मिरवणूक निघाली. मुंबईत शनिवारी प्रचंड पाऊस झाला, तरीही बाप्पाची ओढ भाविकांमध्ये इतकी होती की, तेवढ्या पावसातही आपल्या गणरायाचं यावर्षीचं अखेरचं दर्शन घेण्यासाठी रस्त्यावर तुफान गर्दी जमली होती. अवघ्या दहा किलोमीटरचं अंतर गाठण्यासाठी तब्बल २२ तास लागले.

## दरकपातीचा लाभ ग्राहकांपर्यंत पोहोचवावा ; अर्थमंत्र्यांचा उद्योगांना इशारा

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०७, मुंबई :** अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या कार्यालयाकडून देशातील उद्योग व व्यावसायिक कंपन्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत की २२ सप्टेंबरपासून लागू झालेल्या नव्या दरकपातीची अंमलबजावणी तातडीने त्यांच्या संगणक प्रणालीत (सिस्टीम) करावी. ग्राहकांना देण्यात येणाऱ्या बीलांमध्ये ही दरकपात त्वरित प्रतिबिंबित झाली पाहिजे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

दरकपातीमुळे होणारा लाभ उद्योगांनी स्वतःकडे न ठेवता थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवणे आवश्यक असल्याचेही मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. दरकपातीचा फायदा उद्योगांनी स्वतःजवळ ठेवू नये. तो पारदर्शक पद्धतीने ग्राहकांपर्यंत पोहोचला पाहिजे, असे अर्थमंत्र्यांच्या कार्यालयाने ट्विटद्वारे सांगितले.

सरकारकडून दरकपातीपूर्वी आणि दरकपातीनंतरचे दरांचे कल (ट्रेंड्स) बारकाईने तपासले जात असून, गरज भासल्यास थेट हस्तक्षेप करून ग्राहकांपर्यंत फायदा पोहोचेल याची खात्री केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

दरम्यान, विविध उद्योग संघटना व वाणिज्य मंडळांनीही सरकारला आश्वासन दिले असून कंपन्या स्वयंस्फूर्तीने दरकपातीचा लाभ ग्राहकांना देतील, असा विश्वास अर्थ मंत्रालयाने व्यक्त केला आहे.

## शास्त्रीनगर चौकात फ्लेक्सकांड ! शाळकरी मुलं, ज्येष्ठ नागरिक रोजच्या धोक्यात

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**



**दि.०७, पुणे :** शास्त्रीनगर चौकातून रोज नागरिक मोठ्या प्रमाणावर पायी जातात. सकाळच्या वेळेत शाळकरी मुले, वॉकिंगसाठी येणारे नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि महिला यांचा सततचा वावर असतो. मात्र शास्त्रीनगर पोलिस ठाण्याच्या समोरच उभारलेला प्रचंड बेकायदेशीर फ्लेक्सचा ढाचा त्यांचा जीव धोक्यात घालतो आहे. हा ढाचा थेट फुटपाथ गिळून टाकल्यामुळे नागरिकांना रस्त्यावर उतरून कसरत करत चालावं लागतं. या दरम्यान एखाद्या वाहनाची धडक बसली किंवा छोटा-मोठा अपघात घडला तर त्याची जबाबदारी कोणाची? हा सवाल उपस्थित होतो. फक्त एवढंच नाही, तर गोल्फ क्लब रोडवरून नगररोडला जाणाऱ्या वाहनांना चौकातील सिग्नलच दिसत नाही. परिणामी अपघाताचा धोका सतत डोळ्यासमोर उभा ठाकलेला आहे. शहरातील वाहतूक कोंडी, अपघात आणि गोंधळ वाढवण्याचं मूळ कारण हेच बेकायदेशीर फ्लेक्सचे ढाचे आहेत.


सर्वात धक्कादायक बाब म्हणजे हा प्रकार थेट पोलिस ठाण्याच्या समोर घडतोय. कायद्याचे रक्षक असलेल्या पोलिस ठाण्याच्या दारातच कायदा मोडला जातोय आणि तरीही महापालिका तसेच पोलिस प्रशासन गप्प बसले आहे. यात कोणाचा आश्रय आहे? प्रशासनाला दिसत नाही का? की जाणूनबुजून डोळेझाक केली जातेय? असा सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत.

रोज शाळेत जाणारी लहान मुले, चालणारे ज्येष्ठ नागरिक आणि सकाळी वॉकिंग करणारे नागरिक रस्त्यावरून जीव मुठीत धरून जात आहेत. एखाद्या दिवशी अपघात झाला, लहानग्यांचा जीव गेला किंवा ज्येष्ठ नागरिक जखमी झाले तर त्याला थेट जबाबदार कोण? हा प्रश्न प्रशासनासमोर ठामपणे उभा ठाकलाय. जर या फ्लेक्सच्या ढाच्यामुळे अपघात किंवा जीवितहानी झाली तर जबाबदार कोण? महानगरपालिका, वाहतूक विभाग आणि पोलीस प्रशासनच राहील.

पुणे महापालिका, वाहतूक उपआयुक्त आणि पोलीस आयुक्त यांनी तातडीने कारवाई करून हा बेकायदेशीर फ्लेक्सचा ढाचा हटवावा, अशी नागरिकांची ठाम मागणी होत आहे.

## बाप्पाच्या विसर्जनाला गालबोट, पुण्यात दोन युवकांचा बुडून मृत्यू

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०७, पुणे :** आज राज्यभरात गणपती विसर्जनाचा जल्लोष पाहायला मिळत आहे. सर्वत्र गुलालाची उधळण करत 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष करत गणरायाच्या भक्तांनी प्रत्येक जिल्ह्यातील परिसर दुमदुमून गेलाय. याचदरम्यान, पुण्यातील खेड तालुक्यात एक हृदयद्रावक घटना घडली आहे. वाकी बुद्रूक येथे गणेश विसर्जनादरम्यान दोन युवकांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच हळहळ व्यक्त केली जात आहे.

## पुणे पुन्हा हादरलं, गणेशोत्सवादरम्यान जिल्ह्यात दुसरा मर्डर, सैराटची पुनरावृत्ती

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, पुणे :** गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला दौंड शहरात एका धक्कादायक खुनाच्या घटनेने खळबळ उडाली आहे. बहिणीला पळवून नेल्याच्या रागातून चार जणांनी मिळून एका तरुणावर विटा आणि सिमेंटच्या चौकटीने बेदम मारहाण करत त्याचा खून केला. या घटनेने संपूर्ण शहरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

खून झालेल्या तरुणाचे नाव केतन सुडगे असे आहे. या प्रकरणी दौंड पोलिसांनी निखिल चितारे, प्रेम जाधव, विवेक कांबळे आणि विक्रांत कांबळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, या खुनामागचे कारण वैयक्तिक वाद आणि बहिणीला पळवून नेल्याचा राग असल्याचे समोर आले आहे. आरोपींनी केतनवर विटा आणि






सिमेंटच्या चौकटीने क्रूरपणे हल्ला केला, ज्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेनंतर दौंड पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपींना ताब्यात घेण्यासाठी शोधमोहीम हाती घेतली आहे. स्थानिक नागरिकांमध्ये या क्रूर हत्येमुळे संताप आणि अस्वस्थता पसरली आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला असून, आरोपींच्या पार्श्वभूमी आणि घटनेच्या सविस्तर कारणांचा शोध घेतला जात आहे. गणेशोत्सवासारख्या सणाच्या पार्श्वभूमीवर अशा घटनेमुळे शहरातील शांतता भंग झाली आहे. दौंड पोलीस लवकरच सर्व आरोपींना अटक करून या प्रकरणाचा उलगडा करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर घडलेली ही घटना अत्यंत दुर्दैवी मानली जात आहे. शहरात उत्सवाची तयारी सुरू असताना झालेल्या या खुनामुळे नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे. केतन सुडगे हा तरुण स्थानिक पातळीवर शांत स्वभावाचा म्हणून ओळखला जात होता. मात्र, वैयक्तिक वादातून झालेल्या या हल्ल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून महत्वाचे पुरावे गोळा केले आहेत. तसेच सीसीटीव्ही फुटेज आणि स्थानिकांच्या जबाबांच्या आधारे तपास सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणी आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी स्थानिक नागरिक आणि समाजघटकांनी केली आहे. शहरातील वातावरण पुन्हा शांत करण्यासाठी पोलिसांनी गस्त वाढवली आहे.

## मुंबई- पुण्यातील गणपती विसर्जनाने मोडले सर्व रेकॉर्ड

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, मुंबई :** मुंबई, पुणे, नाशिकसह ठिकठिकाणी संपूर्ण महाराष्ट्रात गणेशोत्सवाचा दहा दिवसांचा सोहळा मोठ्या थाटामाटात पार पडला. यानंतर आता काल अनंत चतुर्दशीच्या दिवशी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात बाप्पाचे विसर्जन करण्यात आले. यंदा मुंबई आणि पुण्यातील गणेश विसर्जन मिरवणुकांनी मागील वर्षाचे सर्व विक्रम मोडले. पुणे शहरातील विसर्जन मिरवणूक तब्बल ३० तासांहून अधिक काळ सुरू होती. ढोल-ताशांचा आवाज आणि गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या या जयघोषाने संपूर्ण वातावरण भारवले होते.

मुंबईतही गिरगाव चौपाटीवर आणि इतर विसर्जन स्थळांवर गणेशभक्तांचा जनसागर लोटला होता. पावसाच्या सरी कोसळत असतानाही भाविकांच्या उत्साहात किंचितही घट झाली नाही. यंदा अनंत चतुर्दशी निमित्ताने गणेशोत्सवाच्या काळात एकूण ३६ हजार ६३२ गणेश मूर्तींचे विसर्जन झाले. ज्यात ५,८५५ सार्वजनिक आणि ३०,४६८ घरगुती गणपतींचा समावेश होता. या मिरवणुकांमध्ये काही ठिकाणी दुर्दैवी घटनाही घडल्या. ज्यामुळे या उत्साहाला काही प्रमाणात गालबोट लागले.

**पुण्यातील विसर्जन मिरवणूक...**

पुण्यात विसर्जन मिरवणूक काल सकाळी ९:३० वाजता सुरू झाली. तब्बल ३० तासांहून अधिक काळ ही मिरवणूक सुरु होती. अलका टॉकीज चौकातून रविवारी दुपारी ३ वाजेपर्यंत २३२ मंडळे विसर्जनासाठी पुढे सरकली. तरीही ९ ते १० मंडळांचे विसर्जन बाकी होते. रात्री १२ वाजल्यानंतर डीजे बंद झाले असले तरी ढोल-ताशा पथकांनी उत्साह कायम ठेवला. पहाटे ६ वाजता डीजे पुन्हा सुरू झाल्यावर मिरवणुकीला पुन्हा वेग आला.

पुण्यातील मानाच्या पाचही गणपतींचे विसर्जन ठरलेल्या वेळेत झाले. मात्र त्यानंतरच्या मंडळांना मोठी वाट पाहावी लागली. मानाचा पाचवा गणपती, केसरीवाडा गणपतीचे विसर्जन सायंकाळी ५:३९ वाजता झाले, तर दगडूशेठ हलवाई गणपतीचे विसर्जन रात्री ९:२३ वाजता झाले. यावेळी शनिपार मंडळाने साकारलेला ३५ फूट उंच देवमासाचा देखाव्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

**मुंबईतील विसर्जन सोहळा...**

मुंबईतील लालबागच्या राजाच्या विसर्जनाला विलंब झाल्याचे पाहायला मिळत आहे. सध्या लालबागचा राजा गिरगाव चौपाटीवर समुद्रात अडकला आहे. यंदा नवीनच बनवण्यात आलेला तराफा आणि भरती या दोन कारणांनी लालबाग राजाच्या विसर्जनाला मोठा विलंब झाला आहे. यामुळे अनेक भाविका लालबाग राजाचं विसर्जन कधी होणार याकडे डोळे लावून बसले आहेत.

मुंबई पोलिसांनी विसर्जनासाठी २१,००० हून अधिक कर्मचारी तैनात होते. तसेच यावेळी एआय आणि ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. यंदा वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी शहरातील ८४ रस्ते बंद ठेवण्यात आले होते. मुंबईतील साकीनाका परिसरात गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान हाय टेन्शन वायरचा धक्का लागून एका व्यक्तीचा मृत्यू झाला, तर पाच जण जखमी झाले. तसेच महाराष्ट्रात विसर्जनादरम्यान चार जण बुडाल्याची आणि १३ जण बेपत्ता झाल्याचीही माहिती समोर आली आहे.




## मेलडी क्वीन आशाताई

गेली सात दशके आपल्या स्वरांनी चाहत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या आणि असंख्य संगीत प्रेमींच्या हृदय सिंहासनावर अधिराज्य गाजवणाऱ्या जेष्ठ अष्टपैलू गायिका, मेलडी क्वीन आशा भोसले यांचा आज वाढदिवस. आशाताईंचा आज ९२ वा वाढदिवस आहे असे सांगितले तर कोणाचा विश्वासही बसणार नाही. कारण आपल्या आवाजाप्रमाणे कायम चिरतरुण असणाऱ्या आशाताईंमध्ये आजही वीस वर्षाच्या तरुणीला मागे पाडेल एवढी ऊर्जा आहे. वयाच्या ९२ व्या वर्षीही त्यांच्यात गाण्याची, स्वर उंचावण्याची क्षमता एवढी आहे की आजही त्यांच्या आसपास कोणतीही गायिका फिरू शकत नाही. आपल्या सात दशकांच्या संगीत कारकिर्दीत त्यांना भारतरत्न सोडता सर्वच पुरस्कार मिळाले. दोन वर्षापूर्वी २४ मार्च २०३३ रोजी आशाताईंना प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराने महाराष्ट्र सरकारतर्फे गौरविण्यात आल्याने संगीत प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथे झालेल्या एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला होता. यावेळी तेव्हाचे उपमुख्यमंत्री व सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, तत्कालीन सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, तत्कालीन शिक्षण मंत्री दीपक केसरकर तसेच भारतरत्न सचिन तेंडुलकर उपस्थित होते. आशा भोसले यांचे संगीत क्षेत्रात खूप मोठे योगदान आहे. आशा भोसले यांनी गेली सत्तर वर्ष संगीत कलेची जी सेवा केली आहे त्याचीच पोचपावती म्हणजे त्यांना मिळालेला महाराष्ट्र भूषण पुरस्कार. ८ सप्टेंबर १९३३ रोजी जन्मलेल्या आशाताईंना संगीताचे बाळकडू त्यांच्या घरातच मिळाले. १९४३ साली माझा बाळ या चित्रपटात दत्ता डावजेकर यांनी संगीतबद्ध केलेल्या चला चला नव बाळा... या गाण्याने आशाताईंनी चित्रपट गायनाला प्रारंभ केला. वयाच्या पंधराव्या वर्षीच म्हणजे १९४८ साली हंसराज बहल यांच्या चुनरिया या चित्रपटात सावन आया हे गाणे गाऊन त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. १९५३ साली बिमल रॉय यांनी त्यांना आपल्या परिणिता या चित्रपटातील गाणी गाण्याची संधी दिली. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. १९५४ साली राज कपूर यांनी बूट पॉलिश या चित्रपटात मोहम्मद रफी यांच्यासोबत नन्हे मुन्ने बच्चे तेरे मुठ्ठी मे क्या है गायला दिले. १९५६ साली सीआयडी हा चित्रपट आला या चित्रपटातील त्यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. १९५७ साली आलेल्या नया दौर या चित्रपटातील गाणी तर खूपच लोकप्रिय झाली आणि सर्वत्र आशाताईंचे नाव झाले. आशाताई हिंदी चित्रपट सृष्टीतील आघाडीची गायिका म्हणून नावारूपास आल्या. त्या काळातील सर्वच संगीतकारांची गाणी त्यांनी गायली. मागील सत्तर वर्षात असा एकही संगीतकार नसेल ज्यांनी आशाताईंना आपल्यासाठी गाण्याची विनंती केली नसेल. १९४८ पासून सुरू झालेला आशाताईंच्या संगीत कलेचा प्रवास आजही अखंडपणे सुरू आहे. आशा भोसले यांनी मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तामिळ, मल्याळम, इंग्रजी, रशियन अशा विविध भाषेत सोळा हजारांहून अधिक गाणी गायली आहेत. त्यांनी एक हजारांहून अधिक चित्रपटासाठी गायन केले. हिंदी चित्रपटसृष्टीतील गायनासाठी त्यांना सात वेळा फिल्मफ अर पुरस्कार तर दोनवेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. २००० साली त्यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्काराने तर २००८ साली मानाच्या पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. २०११ साली सर्वाधिक गाणी गाण्याचा विश्वविक्रम त्यांनी केला. त्यांच्या या विश्वविक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये घेण्यात आली. आशा भोसले यांनी सर्वप्रकारची गाणी गायली आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीवर सुरवातीच्या काळात लता मंगेशकर यांचा वरचष्मा होता. तेंव्हा दुसऱ्या गायिकांना संधी मिळणे अवघड होते हे ओळखून त्यांनी वेगळा मार्ग पत्करला. ज्या प्रकारची गाणी लता मंगेशकर गायच्या त्या प्रकारची गाणी सोडून अन्य प्रकारची गाणी त्यांनी गायला सुरुवात केली. यात पॉप तसेच पाश्चिमात्य सुरावट असलेल्या गाण्यांचा समावेश होता. त्या गाण्यांनी युवकांवर मोहिनी घातली. त्यांनी गायलेले गझल, मुजरे आणि भजनेही लोकप्रिय झाली. संगीतातला कुठलाही प्रकार त्यांनी गायचा सोडला नाही. आशा भोसले यांनी अनेक भाषेत गाणी गायली असली तरी त्यांनी मराठीत सर्वाधिक गाणी गायली आहेत ते स्वाभाविकही आहे त्यांचे बंधू हृदयनाथ मंगेशकर यांच्यासाठी त्यांनी अनेक गाणी गायली आहेत. मलमली तारुण्य माझे, तरुण आहे रात्र अजूनी, मी मज हरपून बसले ग ही त्यांची गाणी इतकी लोकप्रिय आहेत की अजूनही ती स्मरणात आहे. कुठल्याही कार्यक्रमात ही गाणी अजूनही म्हटली जातात. त्यांनी गायलेली सर्वच गाणी लोकप्रिय झाली आहेत. जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या आशाताई म्हणजे आधुनिक काळातील एक आश्चर्य आहे. आशाताईंना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# मुलींच्या शिक्षणासाठी झटणारे हात वाढतील...

मागील आठवड्यात रॅमन मॅगसेसे पुरस्काराची घोषणा झाली. या वर्षी एज्युकेट गर्ल्स या भारतीय संस्थेला हा पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. ७ नोव्हेंबरला मनाली येथे हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

एज्युकेट गर्ल्स ही संस्था प्रामुख्याने मुलींच्या शिक्षणासाठी काम करते. २००७ मध्ये सफिना हुसेन यांनी या संस्थेची स्थापना केली. राजस्थानातील अवघ्या ५० गावांपासून सुरुवात करून या संस्थेने तीस हजारांहून अधिक गावांपर्यंत आपले शैक्षणिक कार्य रुंदावत नेले. त्यामुळे वीस लाखाहून अधिक मुली शाळेत दाखल झाल्या. एज्युकेट गर्ल्स मुलींच्या घरापर्यंत आपल्या स्वयंसेवकांमार्फत पोहोचते, मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देते आणि त्यांना शाळेत दाखल करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करते.

सफिना हुसेन यांच्या मते, जगातील कुठल्याही समस्येवर मुलींना शिकवणे हेच उत्तर आहे. म्हणूनच २०३५ पर्यंत एक कोटी मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा त्यांचा संकल्प आहे. शाळाबाह्य मुलींवर लक्ष केंद्रित करून शिक्षण व्यवस्थेविरुद्ध काम करण्याऐवजी व्यवस्थेसोबत काम करण्याचे धोरण एज्युकेट गर्ल्स ने स्वीकारले आहे.

अभ्यासकांच्या मते, जर भारतातील सर्व मुलींनी बारा वर्षांपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले, तर पुढील दशकात भारताचे सकल राष्ट्रीय उत्पन्न दहा टक्क्यांनी वाढू शकेल. अर्थातच यामागे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फ ुले यांच्या एक मुलगी शिकली तर सारे कुटुंब शिकते या सिद्धांताचा आधार आहे. भारतात मुलींच्या शिक्षणाचे मुहूर्तमेढ खऱ्या अर्थाने रोवले ते या दांपत्यांनीच. १८४८ रोजी पुण्यात भिडे वाड्यात त्यांनी पहिली मुलींची शाळा सुरू केली होती. यासाठी महात्मा फ ुले यांनी प्रथमतः आपली पत्नी सावित्रीबाई फ ुले यांना शिक्षित केले.खरं तर त्या काळात हे कार्य अजिबात सोपे नव्हते. समाजकंटकांनी सावित्रीबाई फुले मुलींना शिकवण्यासाठी जात असताना त्यांच्यावर दगड-गोटे फेकले. मुली शिकल्या तर धर्म बुडेल, स्त्रिया या बुद्धिमान नसतात, त्यामुळे त्यांना शिक्षणाची गरज नाही, अशा कुसंस्कारी कल्पना मांडणाऱ्यांनी मुलींच्या शिक्षणाला सुरुवातीला कडाडून विरोध केला. स्त्रियांना चूल आणि मूल याच्या पलीकडे विचार करू नये, अशी पुरुषसत्ताक मानसिकता मोडून काढण्यासाठी बराच काळ लागला. समाजपरिवर्तन हे कासवगतीने होत असते. मोठे सामाजिक बदल झटक्यात घडलेले जगात कुठेच दिसत नाहीत.

काळानुसार समाजाला स्त्रीशिक्षणाचे महत्त्व पटू लागले. महर्षी धोंडो केशव कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील यांसारख्या सम ाजसुधारकांनी ही चळवळ पुढे नेली.

आजही अनेक मुलींना शिक्षण अर्धवट सोडावे लागते. त्याची कारणे म्हणजे कमी वयात विवाह होणे, घरकामाचा भार, लहान भावंडांची जबाबदारी, जवळ शाळा नसणे, टवाळखोरांकडून होणारी छेडछाड, तसेच लिखाण-वाचन न जमणे इत्यादी. मागास व अल्पसंख्याक समाजात मुलींच्या शिक्षणातील गळतीचे प्रमाण अधिक आहे.

मुलींसाठी शिक्षणाची दारे दोन शतकांपूर्वीच उघडली आहेत. आता त्या दारापर्यंत मुलींना नेऊन गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे काम स्वयंसेवी संस्था, शासन आणि शिक्षक यांना करावे लागणार आहे. महाराष्ट्र राज्याची सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना ही मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन देणारी ठरत आहे. याअंतर्गत अल्पसंख्याक समुदायातील (VJNT, SBC व SC) ५वी ते १०वी इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थिनींना आर्थिक साहाय्य दिले जाते. त्याचप्रमाणे बिहारमधील सायकल योजना मुलींचे शाळा सोडणे कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

कोणत्याही समाजाची सांस्कृतिक पातळी त्या समाजातील स्त्रियांची परिस्थिती कशी आहे, यावरून ठरते. खेड्यांतील आणि दुर्गम भागांतील प्रत्येक मुलगी शिक्षित झाल्यावर भारत विकसनशील देश न राहता विकसित देश होईल.

एज्युकेट गर्ल्स ला मिळालेल्या रॅमन मॅगसेसे पुरस्कारामुळे मुलींच्या शिक्षणासाठी झटणारे हात निश्चितच वाढतील.



-किशोर जाधव
सोलापूर
मो.९९२२८८२५४१

# दादांचा दरारा की- दादागिरी..!!

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा व्हायरल व्हिडीओ सध्या खूपच चर्चेत आहे. सोलापूरच्या कुई गावातील अवैध मुरूम उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करत असलेल्या एका आयपीएस अधिकारी महिलेला अजित पवार फोनवरून दमदाटी करताना त्यात दिसतात. म्हणजेच या व्हिडीओत त्यांचा आवाज ऐकू येत आहे. यावरून मागच्या दोन दिवसांपासून टीका झेलत असलेल्या अजित पवारांना अखेर नाईलाजास्तव का होईना या प्रकरणावर खुलासा करावा लागला आहे. अंजली कृष्णा नावाच्या या महिला आयपीएस अधिकारी आहेत. कुई गावातील मुरूम उत्खनन करणाऱ्या काही जणांवर त्या कारवाई करत होत्या. ते सर्वजण राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते होते. त्यांच्यापैकी एक राष्ट्रवादीचा तालुकाध्यक्ष होता. चार ते पाच दिवसांपूर्वीचे हे प्रकरण असल्याचे म्हटले जाते. अंजली कृष्णा कारवाईच्या पवित्र्यात असताना राष्ट्रवादीचे हे कार्यकर्ते त्यांना शाब्दिक प्रतिकार करत होते. ही चकमक सुरू असतानाच तालुका अध्यक्षांनी थेट अजित पवारांनाच फोन लावत हा फोन अंजली कृष्णा यांच्या हाती सोपवला. यावेळी अजित पवारांनी संबंधितांना सोडून देण्याचे निर्देश तालुका अध्यक्षांच्या फोनवरून कृष्णा यांना दिले. यातूनच पुढची गडबड झाली.

कृष्णा या मूळच्या महाराष्ट्राबाहेरील असल्यामुळे त्यांना अजित पवारांचा आवाज ओळखू आला नसावा. मैं डीसीएम अजित पवार बोल रहा हूँ. ये कारवाई बंद करो... मेरा आदेश हैं.. असे अजित पवार त्यांना हिंदीतून सांगत होते. शेवटी त्या कुणी सर्वसामान्य व्यक्ती नाहीत की कुणाच्याही बोलण्यावर सहज विश्वास ठेवतील. त्या आयपीएस अधिकारी आहेत. त्यामुळेच त्यां आहेत. त्यामुळेच त्यांनी खातरजमा करण्यासाठी माझ्या वैयक्तिक फोनवर कॉल करा, असे अजित पवारांना सांगितले. ज्यात काहीही चुकीचे नव्हते. मात्र, त्यामुळे अजित पवारांचा पारा आणखीनच चढला. मैं तुम पे ॲक्शन लूंगा.. इतनी डेरिंग है तुम्हारी.. मेरा चेहरा तो पेहचानोगी ना.. असे म्हणत अजित पवारांनी शेवटी त्यांना व्हिडीओ कॉल केला. हाच तो व्हिडीओ जो बघता बघता व्हायरल झाला आणि खुद्द उपमुख्यमंत्र्यांनी कारवाईचा इशारा दिल्यामुळे चिंतेत असलेल्या आयपीएस अधिकारी महिलेला प्रशासकीय स्तरातून पाठिंबा मिळू लागल मिळू लागला. अजित पवार हे आपल्या रांगड्या स्वभावासाठी




ओळखले जातात. सकाळपासूनच त्यांच्या कामाचा सपाटा सुरू होतो ते रात्री उशिरापर्यंत. अजित पवार एका बाजूला प्रशासकीय अधिकारी आणि दुसऱ्या बाजूला कार्यकर्त्यांच्या गराड्यात काम उपसत असतात. अजित पवारांकडे काम घेऊन गेलेला पक्षाचा कुठलाही पदाधिकारी, कार्यकर्ता खाली हाताने किंवा निराश मानेने परतत नाही ही अजित पवारांची ख्याती आहे.

मागच्या कित्येक वर्षांपासून अव्याहतपणे सुरू असलेला अजितदादांच्या कामाचा उरक बघून त्यांचे विरोधकही त्यांचे त्यांच तोंड भरून कौतुक कौतुक करताना दिसतात. महाराष्ट्रातील प्रशासकीय व्यवस्थेची नस अजित पवारांना चांगलीच माहीत आहे. ही यंत्रणा कशी काम करते आणि तिच्याकडून कशा रितीने काम करून घेतले पाहिजे हेदेखील अजित पवार चांगलेच ओळखून आहेत. त्यामुळे कधीकधी कामात हयगय झाल्यास अधिकारी-कर्मचाऱ्यांना जाहीररित्या दमदाटी करायलाही ते मागेपुढे पाहात नाहीत. भीतीयुक्त दरारा निर्माण करणारे अजितदादा जाहीर व्यासपीठावर बोलताना कधीकधी तारतम्य विसरतात हेही तितकेच खरे. धरणातील पाणी संपल्यावर काय करायचं, याविषयी त्यांनी केलेले अफलातून विधान तर जगजाहीर आहे. पुण्यातील येरवडा कारगृहाच्या जमिनीचा मुद्दाही असाच गाजला होता.

ताज्या प्रकरणातला फरक एवढाच की अजित पवारांच्या फोनमुळे ते बेकायदेशीर मुरुम उत्खनन कारवाईत हस्तक्षेप करत असल्याचे चित्र तयार झाले. मागच्या काही वर्षांमध्ये राज्यातील गाव-खेडी शहरांचा झपाट्याने विकास होत आहे. परिणामी गावातील लहानशा बांधकामांपर्यंत मर्यादित असणाऱ्या वाळूची मागणी अलीकडच्या काळात प्रचंड वाढली आहे. वाळू उत्खननातून अत्यंत कमी कालावधीत बेसुमार पैसा मिळत असल्याने गाव-खेड्यातील तरुण मोठ्या संख्येने या व्यवसायात उतरला आहे. त्यातही संबंधित परिसरात ज्या राजकीय पक्षाचा दबदबा आहे त्या पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी या व्यवसायात जम बसवला आहे. तर, काही ठिकाणी वाळू माफिया तयार झाले आहेत. हे वाळू माफिया सर्व सरकारी नियम पायदळी तुडवून दिवस-रात्र वाळूचा उपसा करतात. वाळू तस्करांनी त्यांची स्वतःची बेकायदेशीर यंत्रणाही बनवली आहे. जेसीबी, पोकलेन, यांत्रिक बोटी अशा अजस्त्र यंत्रांनी या व्यवसायात प्रवेश केला आहे. माफिया, सरकारी यंत्रणा आणि राजकीय वरदहस्त अशा साखळीच्या माध्यमातून नदीपात्रातील वाळू उपसून शहरांकडे पाठवली जाते. अवैधरित्या वाळूचा उपसा करणाऱ्या वाळू माफियांवर कारवाई करणाऱ्या महसूल विभागाच्या पथकांवर वाळू माफियांनी हल्ले केल्याची अनेक उदाहरणे आहे. वाळूचा अवैध उपसा रोखून वाळू माफियांना चाप लावण्यासाठी महसूल विभागाने मध्यंतरीच्या काळात कठोर पावले उचलली होती. गौण खनिजासंदर्भातील अधिकार आता जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात आले आहेत. अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्या वाळू माफियांवर एमपीडीए अंतर्गत गुन्हे नोंदवण्याचे तसेच या तस्करीत सामील महसूल अधिकारी, कर्मचाऱ्यांवर निगराणी ठेवण्यात यावी. त्यांच्यावरही कडक कारवाईचे आदेश राज्य सरकारने जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना दिलेत. वाळू माफियांवर कारवाई करताना मंत्री, खासदार, आमदारांच्या सूचना आल्या तरी त्यांना सोडू नका, अशी भूमिका राज्य सरकारची असताना खुद्द उपमुख्यमंत्र्यांकडून तसा आदेश आल्याने यंत्रणांचे खच्चीकरण होणे स्वाभाविक आहे. पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या दबंग दुनियेतल्या दादांनी इथे थोडे तारतम्य बाळगायची गरज होती. अर्थात महिला अधिकाऱ्यांबद्दल आदरभाव व्यक्त करून वाळू माफियांविरोधात कठोर कारवाईस कटिबद्ध आहे, असा खुलासा दादांनी केला हे बरेच झाले. फक्त ते कृतीत उतरायला हवे.

## दानपेटी..

महोत्सव सु संपन्न
ओसंडली दान पेटी
भरभरून देतीभक्त
न धरता कुणा वेठी

स्वयंसेवक सरसावे
दानमोजदादी साठी
वैभवे डोळे दिपले रे
आल्या अमूल्य भेटी

कुणीफेडले ते नवस
भरते धान्याचीकोठी
कुणी दिले उस्फुर्तते
प्रसन्नला जगत् जेठी

दानविनियोग उचित
आताखरीचं कसोटी
करे सुयोग्यनियोजन
धर्मस्थळांची हातोटी

चालवावीत अन्नछत्रे
सुग्रास भुकेल्यापोटी
दाणे शीते भरवावीत
पक्षीप्राणी मात्रा ओठी

मदतीस गरजू करता
उघडावी सहज ताटी
योजना सुलभ हव्या
खर्चिक उपचारासाठी

**– हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# भगंदर मूळव्याध तसेच फिशर आजरावर आयुर्वेद कसे काम करते ?

सामान्यतः या हे आजार वर अवलंबून आहे. शस्त्रक्रिया करणे हे असहनीय वेदना होत असल्यास तसेच आजार जास्त प्रमाणात वाढल्यास आपण करायला पाहिजे. पण त्या अगोदर जेव्हा आपल्याला आजाराची सुरवातीचे लक्षण जाणवते, आपण आयुर्वेद उपचार घेऊन आजाराला कायमचे नाहीसे करू शकतो. विबंध सारखे लक्षण आढळ्यास आपण त्रिफळा चुर्ण, पंचसकार चुर्ण कोमट पाण्यासोबत घेणे रात्री झोपताना किंवा आजाराच्या अवस्थेनुसार आपण ठरवू शकतो. यासोबतच गरम पाण्यामध्ये स्टीज बाथ घेणे दोन वेळा दिवसातून आर्युवेदीक तेलाची बस्ती घेणे जसे की बला तेल, पंचतिक्त घृत हे खूप आराम दायी आहे. जास्त वेदना झाल्यास तुम्ही वेदानाशमन जेल वापरू शकता. हे उपाय तुम्ही १ मास ते २ मास घेऊन आजाराचे



लक्षण कमी करू शकता. सुरुवात असल्यास पूर्णपणे आजार नाहिसे होणार. कोणत्याही प्रकारचे साईड इफेक्ट तुम्हाला जाणवणार नाही. इतके करून सुद्धा आजार लक्षण वाढत असल्यास व प्रमाणाच्या बाहेर लक्षण गेल्यास तुम्ही शस्त्रक्रियाकडे वळू शकता. भगंदर सारख्या आजारामध्ये क्षारसुत्र द्वारा आपल्याला चांगले निवारण रुग्नांमध्ये बघायला भेटले आहेत. त्यामुळे वर्षनु वर्ष आजाराकडे दुर्लक्ष न करता लवकरात लवकर उपाय योजना करायला पाहिजे. अतिशय जास्त लक्षण वाढल्यास शस्त्रक्रिया दरम्यान पूर्णपणे निवारण करण्यास त्रास जातो. संक्रमन हे अस्थि मार्गावर असल्यास कॅन्सरसारखा आजार होण्याची शक्यता वाढून जाते. त्यासोबतच आपल्या आहारावर नियंत्रण ठेवणे तसेच आपली पचनप्रक्रिया सुरळीत ठेवणे गरजेचे आहे.

– डॉ. तेजश्री बन्सोड (शल्यतंत्र)
महात्मा गांधी आयुर्वेदिक
रुग्नालय सांवगी (वर्धा)

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



## थोडक्यात

### श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा





**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, बुलडाणा :** श्री शिवाजी विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय बुलडाणा येथे शिक्षक दिन साजरा करण्यात आला. शिक्षक दिनाचा औचित्य साधून आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा सुद्धा संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य कावरे सर प्रमुख उपस्थितीमध्ये जुनिअर कॉलेज विभागप्रमुख भोंडे सर, पंढरीनाथ वाघ सर, मांगे बाबूजी उपस्थित होते. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. तसेच विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही हे मूल्य रुजवण्यासाठी शाळेचे प्राचार्य कावरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी निवडणूक घेण्यात आली होती. या निवडणूकीमध्ये निवडून आलेल्या विद्यार्थ्यांचा शपथविधी सोहळा सुद्धा यावेळी संपन्न झाला.

तसेच श्री शिवाजी विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय बुलढाणा येथे आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा संपन्न झाल. यामध्ये काळवाघे सर, ढोमणे सर, मते मॅडम व शेवाळे दादा यांना हा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. तसेच जिजामाता महाविद्यालय बुलढाणा येथे संपन्न झालेल्या शिक्षक पुरस्कारामध्ये श्री शिवाजी विद्यालय बुलढाणा येथील पर्यवेक्षक राजपूत सर यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन आणि नियोजन पंढरीनाथ वाघ सर व अरुण साळोख सर यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे छायाचित्रण गणेश वाघ सर यांनी केले. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### एम.सी.ई डी.मार्फत विरारमध्ये ॲक्युप्रेशर तंत्रज्ञ प्रशिक्षण

#### सुशिक्षित बेरोजगार युवक युवतीसाठी सुवर्णसंधी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, पालघर :** उद्योग संचालनालय– महाराष्ट्र शासन अंतर्गत कार्यरत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र आणि आर. जे.हेल्थ केअर यांच्या संयुक्त विद्यमाने सुशिक्षित बेरोजगार युवक आणि युवती यांना स्वयंरोजगार प्राप्त व्हावा यासाठी ॲक्युप्रेशर तंत्रज्ञ प्रशिक्षण कार्यकमाचे विरार येथे ९ सप्टेंबर २०२५ पासून आयोजन केले आहे.

सदरील पाच दिवसाच्या ट्रेनिंगमध्ये ॲक्युप्रेशर संकल्पना मूलभूत माहिती ॲक्युप्रेशर तंत्रज्ञान कसे उपयोगात आणावे, ॲक्युप्रेशर विविध प्रकार संपूर्ण माहिती, ॲक्युप्रेशर पॉईंटची प्रात्यक्षीकासह ओळख, ॲक्युप्रेशर तंत्रज्ञान क्षेत्रातील विविध उद्योग संधी, उद्योजकीय मानसिकता आणि उद्योजकीय गुणसंपदा, शासकीय योजना आणि उद्योग विभाग यांची माहिती, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम संपूर्ण माहिती व मार्गदर्शन इत्यादी विषयाचे शासकीय तथा निम शासकीय तज्ञ मार्गदर्शकांमार्फत मार्गदर्शन होणार आहे.

यशस्वीपणे प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थीना महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र मार्फ़त प्रमाणपत्र देऊन पुढील दोन वर्ष उद्योग उभारणीसाठी मोफतपणे पाठपुरावा/मदत करण्यात येईल.

दि.०९ ते १३ सप्टेंबर २०२५ या कालावधीत या ट्रेनिंग आर. जे.हेल्थ केअर सेन्टर, ए/१०१ मधुमंगल बिल्डिंग, रेल्वे स्टेशन सब वे च्या पुढे, HDFC बँकेच्यावर विरार (पूर्व) ता.वसई जि.पालघर येथे होणार आहे.

इच्छुकांनी https://mced.co.in/Training_Details/?id=4325 या लिंक वर ऑनलाइन नोंदणी करावी.अधिक माहितीसाठी प्रशिक्षण समन्वयक स्वाती भोईर मो.९२८४८०८७६१, प्रकल्प अधिकारी धम्मपाल थोरात मो.९१६८६६७१६३, किंवा डॉ. सुशिल सावंत –तांत्रिक प्रशिक्षक मो.८४४६२६२९३३ यांना संपर्क करून या सुवर्ण संधीचा लाभ घेण्याचे आवाहन डी. यू. थावरे विभागीय अधिकारी एम.सी. ई.डी. मुंबई/कोकण यांनी केले आहे.

### विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या शिक्षकांची संवेदनशील दखल



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०७, खंडाळा (सातारा) :** शिक्षक दिन पूर्व संध्येस लोणंद येथील मयुरेश्वर मित्र गणेशोत्सव मंडळ आयोजित शिक्षक दिन निमित्त प्रदीर्घ अनुभवी प्राथमिक–माध्यमिक शिक्षक,मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका, केंद्र–प्रमुख वृंद यांची विशेष उपस्थितीत तब्बल १०० हून अधिक शिक्षकांचा शाल आणि श्रीफळरुपी सन्मान ज्येष्ठ नेते मिलिंद लक्ष्मणराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी गत ३३ वर्षांपासून सुरू असणाऱ्या समारंभबद्दल बोलताना मयुरेश्वर मित्र मंडळाचे संस्थापक तथा माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मणराव शेळके पाटील म्हणाले–माझं अस्तित्व फक्त शिक्षकांवर अवलंबून आहे. १९९२ साली तत्कालीन केंद्रप्रमुख ठोंबरे यांनी १४७ शिक्षक जोडून दिले. सद्यस्थितीत खंडाळा तालुक्यातील संवाद आणि आस्थेतून जोडलेली शिक्षक संख्या ४९७ एवढी आहे. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या शिक्षकांचा यथोचित गौरव करणारे मयुरेश्वर मित्र गणेशोत्सव मंडळ एकमेव असून यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्व माजी–आजी पदाधिकाऱ्यांचा मला सार्थ अभिमान आहे.

यावेळी पहिल्यांदा सन्मानित करण्यात आलेले सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय,खंडाळा मध्ये राज्यशास्त्र विभागात कार्यरत सहाय्यक प्राध्यापक अमीर इनामदार म्हणाले– वय आणि अनुभव ज्येष्ठ माणसांच्या सोहळ्यात मी लहान असून माझ्या आजपर्यंतच्या प्रवासात विद्यार्थी–विद्यार्थिनी उभारणीसाठी कार्यविश्वाची जाज्वल्य जाणीवेतून दखल घेत लक्ष्मणराव शेळके तात्यांनी निमंत्रित करून सन्मानित केलं. याबद्दल मी आपला कृतज्ञ आहे. हा सोहळा यशस्वी होण्यासाठी अड.गणेश शेळके, गजेंद्र मुसळे, स्वप्नील वाघमारे, विनायक तेलकर आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

## न्या. चंद्रशेखर यांनी घेतली मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०७, ठाणे :** मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती न्या. चंद्रशेखर यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ घेतली.

राजभवन येथे झालेल्या एका छोटेखानी शपथविधी समारंभामध्ये राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी न्या. चंद्रशेखर यांना पदाची शपथ दिली. शपथ दिल्यानंतर राज्यपालांनी व त्यांच्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी न्या. चंद्रशेखर यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

शपथविधी सोहळ्याला विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, लोकायुक्त न्या. (नि.) विद्यासागर कानडे तसेच राजस्थान, झारखंड, दिल्ली, अलाहाबाद, कर्नाटक व मुंबई उच्च न्यायालयातील न्यायाधीश व सेवानिवृत्त न्यायाधीश उपस्थित होते.

सुरुवातीला राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांनी न्या. चंद्रशेखर यांच्या नियुक्तीबाबत केंद्र सरकारची अधिसूचना वाचून दाखवली. शपथविधी सोहळ्याची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**न्या. चंद्रशेखर यांचा जीवन परिचय :**

न्यायमूर्ती चंद्रशेखर यांचा जन्म २५ मे १९६५ रोजी झाला. त्यांनी सन १९९३ मध्ये दिल्ली विद्यापीठाच्या कॅम्पस लॉ सेंटर येथून एलएलबी पदवी प्राप्त केली आणि ९ डिसेंबर १९९३ रोजी दिल्ली राज्य बार कौन्सिलमध्ये वकिली व्यवसायासाठी नोंदणी केली.

दिल्ली येथे त्यांनी फौजदारी तसेच दिवाणी अशा दोन्ही प्रकारच्या खटल्यांमध्ये वकिलीला सुरुवात केली. १९ वर्षांच्या वकिली कारकिर्दीत त्यांनी विविध न्यायालयांमध्ये सुमारे ३५०० खटले लढविले, ज्यांपैकी बहुतेक सर्वोच्च न्यायालयात होते. सर्वोच्च न्यायालयातील १४० निवाडे अहवालित झाले असून त्यामध्ये ते वकील म्हणून उपस्थित होते.

त्यांनी अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद आणि झारखंड राज्य यांचे सर्वोच्च न्यायालयात स्थायी वकील म्हणून काम केले. तसेच बिहार राज्य गृहनिर्माण मंडळ, बिहार राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ, झारखंड राज्य वीज मंडळ, भारतीय कृषी अनुसंधान परिषद आणि इतर अनेक महामंडळे, संस्था यांचे प्रतिनिधित्व केले. याशिवाय ते काही खासगी कंपन्यांचे कायमस्वरूपी वकील होते.

त्यांची नियुक्ती १७ जानेवारी २०१३ रोजी झारखंड उच्च न्यायालय, रांची येथे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून झाली आणि २७ जून २०१४ रोजी झारखंड उच्च न्यायालय, रांची येथे कायमस्वरूपी न्यायाधीश म्हणून करण्यात आली. त्यांनी २९ डिसेंबर २०२३ ते ४ जुलै २०२४ या कालावधीत झारखंड उच्च न्यायालयाचे कार्यकारी मुख्य न्यायाधीश म्हणून कार्यभार सांभाळला.

त्यानंतर त्यांची मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश पदावर पदोन्नती झाल्यानंतर त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायाधीश म्हणून कार्यभार स्वीकारला.

## पाटणमध्ये नेत्रदीपक देखाव्यांनी श्रीगणेशाला भावपूर्ण निरोप



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०७, पाटण :** बारा दिवस गणरायाची मनोभावे पूजा अर्चा करून अनंत चतुर्दशीला पाटण तालुक्यातील सार्वजनिक गणेश मंडळांनी लाडक्या गणरायाला भक्तिमय वातावरणात निरोप दिला. गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या अशी विनवणी करत मोरया मोरया च्या जयघोषाने परिसर दणाणुन गेला होता. नयनरम्य रोषणाई नेत्रदिपक सजावटिची परंपरा असणारया सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या विसर्जन मिरवणुका बॅड बेंजो ढोल व झांजपथकाच्या निनादात उत्साहात झाल्या.

या मिरवणुका तालुक्यातील हजारो भाविकांनी पाटण शहरात हजेरी लावली होती. पाटण शहरात केवळ मोरयाच्या घोषणा ऐकु येत होत्या, संपुर्ण जिल्हात वैशिष्टयपुर्ण परंपरा असणारया पाटणमधील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी यावर्षीही परंपरा कायम ठेवत आकर्षक सजावटिसह डोळयांचे पारणे फेडणारे देखावे सादर केले. आकर्षक विद्युत रोषणाई सामाजिक विषय सजिव देखाव्यातुन सादर करण्याची परंपरा कायम होती. पाटणमधील मानाचा हनुमान सेवा मंडळ, शिवाजी उदय मंडळ, समाज सेवा संघ, प्रताप सेवा मंडळ, शिवलिंग मंडळ, नूतन तरुण मंडळ, अष्टविनायक तरुण मंडळ, गजानन सेवा मंडळ, नवरत्न मडळ, रणजित सेवा मंडळ, बालगणेश मंडळ, गणेश सेवा मंडळ, शिवलींग मंडळ, श्रीराम गणेश मंडळ, नवभारत मंडळ, भाजी मंडई मंडळ, गणेश सेवा मंडळ, कलाकार गणेश मंडळ, गणेश सेवा मंडळ, कुंभारवाडा मंडळ, आदि मंडळांनी कायम ठेवली, अनंत चतुर्दशीला आदल्या दिवशी दि.५ रोजी पाटण शहरातील १०

सार्वजनीक मंडळांनी गणेशमुर्तीचे विसर्जन केले. अनंत चतुर्दशीला दि.६ रोजी दुपारी ४ सुमारास गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीला प्रारंभ झाला, शहरातील १७ सार्वजनिक मंडळांनी लाडक्या गणरायाला उत्साहात भावपुर्ण निरोप दिला. पाटण शहरातील मिरवणुकिचे खास आकर्षण व डोळयांचे पारणे फेडणारे विविध देखावे सादर केले.

महाराष्ट्रातील प्रसिध्द बॅड व बेंजो पथकाच्या तालावर व झांजपथक ढोल लेझीम पथकांच्या उपस्थितीत निघालेल्या मिरवणुका पाहण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. वाद्यांसाठी मर्यादा नसल्याने सर्व मंडळांनी सायंकाळी लवकर मिरवणुकीमध्ये बॅड व बेंजोच्या तालावर तरूणाई थिरकत होती. शुक्रवारी रात्री १२ वाजता तर शनिवारी रात्री १२ वाजता शहरातील मिरवणुका बंद करण्यात आल्या.

सर्व गणेश मंडळांनी घोषणा देत गणपतीचे कोयना नदीपात्रात विसर्जन केले. प्रशासनाने केलेल्या डॉल्बीमुक्त उत्सवाच्या आवाहनास सर्व मंडळांनी प्रतिसाद दिला. विसर्जन मिरवणुक शांततेत होण्यासाठी उपविभागीय पोलिस अधिकारी विजय पाटील, पोलिस निरीक्षक अविनाश कवटेकर, यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दरम्यान रात्री उशीरा मानाच्या हनुमान सेवा मंडळाच्या आरतीने विसर्जन मिरवणुकीची सांगता झाली. गणेशोत्सव शांततेत होण्यासाठी सहकार्य केल्याबध्दल विजय पाटील व अविनाश कवटेकर यांनी मंडळांना व नागरिकांना धन्यवाद दिले.

**नवरत्न मंडळचा जिवंत देखावा लक्षवेधी ठरला.**

मिरवणुकीचे खास आकर्षण ठरलं ते नवरत्न तरुण मंडळ यांनी महादेव तांडव नृत्य बघण्यासाठी प्रेक्षकांची तोबा गर्दी जमत होती. त्यामुळे गणपती पेठेतील रस्ता पूर्ण जाम होत होता. गर्दीला पांगवताना पोलिस प्रशासनाला मोठी कसरत करावी लागत होती.

**पाटण पोलीस स्टेशनचा आदर्श...**

पाटण पोलीस स्टेशने समाजाला आदर्श घालून दिला पाटण पोलीस स्टेशनमध्ये गणपतीची प्रतिष्ठापना केली होती गणपतीचे पारंपारिक वाद्याने मिरवणूक काढून विसर्जन केले यावेळी पाटण पोलीस स्टेशनचे डी.वाय.एसपी. विजय पाटील पोलीस निरीक्षक अविनाश कवटेकर व सर्व पोलीस कर्मचारी यांनी फेटे परिधान केले होते त्यामुळे विसर्जन मिरवणुकीचे नागरिकांनी व्हावा केली.

## लोकमान्य टिळक कन्या विद्यालयात 'शिक्षक दिन' साजरा




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७ चंद्रपूर :** लोकमान्य टिळक स्मारक मंडळ चंद्रपूर द्वारा संचालित लोकमान्य टिळक कन्या विद्यालय चंद्रपूर येथे भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस 'शिक्षक दिन' हा 'स्वयंशासन' म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका संध्या बडकेलवार, उपमुख्याध्यापिका अर्चना दुर्गपुरोहीत व पर्यवेक्षिका प्रांजली महादानी यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला दिप प्रज्वलित करुन माल्यार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांचा सन्मान म्हणून शिक्षकांना भेटवस्तू देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

स्वयंशासन उपक्रमामध्ये शिक्षक दिनानिमित्त एक दिवसाच्या मुख्याध्यापिका म्हणून दिव्या तावाडे, वर्ग १० वा, उपमुख्याध्यापिका म्हणून कल्याणी मानिक वर्ग ९ वा तर पर्यवेक्षिका म्हणून गुंजन कुंभारे तर लिपीक, शारिरीक शिक्षक, शिपाई यांची जबाबदारी विद्यार्थिनींनी चांगली पार पाडली. यामध्ये ६० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष तथा मुख्याध्यापिका संध्या बडकेलवार यांनी शिक्षक दिनाचे महत्व सांगितले. तसेच दुर्गपुरोहीत मॅडम नी यावेळी मार्गदर्शन केले. तसेच दिपक गावंडे सरांनी सुद्धा मार्गदर्शन केले.

याप्रसंगी एका दिवसासाठी झालेल्या मुख्याध्यापिका व काही शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आपले मनोगत कार्यक्रमात व्यक्त केले. या उपक्रमासाठी जे. पी. राठोड, के. यु गोन्नाडे व जोशी मॅडम नी जबाबदारी उत्कृष्टपणे पार पाडली. कार्यक्रमाचे संचालन चेतना प्रधान व रामटेके या विद्यार्थिनींने केले.

### जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना ईद मिलादुन्नबी निमित्त भोजन वाटप



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०७, सुपा (अहिल्यानगर) :** पैगंबर मोहम्मद पैगंबरांचा जन्मदिन अर्थात ईद मिलादुन्नबी उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने सुपा येथील समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना प्रेम व ऐक्याचे प्रतीक म्हणून भोजन वाटप करण्यात आले.

या उपक्रमाद्वारे सामाजिक बांधिलकी जपण्याबरोबरच सर्वधर्मीयांमध्ये बंधुभाव वाढविण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमात सरपंच व उपसरपंच स्थानिक मान्यवर मुस्लिम समाज, शिक्षक व समाजातील नागरिक उपस्थित होते.

# राज्य महोत्सवाच्या जल्लोषात गिरगाव चौपाटीवर मुख्यमंत्र्यांचा गणरायाला निरोप

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०७, ठाणे :** महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे, त्या उत्सवाचा जल्लोष आज गिरगाव चौपाटीवर उच्चांक गाठताना दिसला. या सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः उपस्थित राहून गणरायाला निरोप दिला.राज्य महोत्सवाच्या या उत्साहात गीरगाव चौपाटीवर विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री मंगलप्रभात लोढा, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्यमंत्री योगेश कदम, आमदार अमित साटम, मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त अमितकुमार सैनी तसेच हजारो भाविक यांची उपस्थिती होती. ढोल-ताशांच्या गजरात आणि गणपती बाप्पा मोरयाच्या गजरात वातावरण भारावून गेले होते. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबईतील गिरगाव चौपाटी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सभापती प्रा.राम शिंदे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक मान्यवरांनी गणेश मूर्तींवर पुष्पवृष्टी करून गणरायांना निरोप दिला.



राज्यात १० दिवसांचा गणेशोत्सव उत्साहात आणि शांततेत पार पडल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. लोकांनी हा उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला. बाप्पाच्या विसर्जनावेळी मनात थोडीशी खंत व दु:ख होते. कारण १० दिवसांनी बाप्पा आपल्याला सोडून जातात. पण याचबरोबर पुढच्या वर्षी ते परत येणार आहेत याचा आनंदही असतो, असे फडणवीस म्हणाले. मुंबई, पुणे तसेच राज्यातील सर्व शहरांमध्ये, गावांमध्ये गणेशोत्सवाच्या मिरवणुका शांततेत व शिस्तीत पार पडल्या. पोलीस विभाग, महानगर पालिका आणि स्थानिक प्रशासन यांनी केलेल्या व्यवस्थेमुळे हा उत्सव सुरळीत पार पडला. त्यांचे काम कौतुकास्पद आहे, असेही फडणवीस यांनी सांगितले. गिरगाव चौपाटीवरील विसर्जन सोहळ्याला मुंबईकरांसोबत विविध मान्यवरांची ही उपस्थिती होती. मुंबई महानगरपालिका, पोलिस व स्वयंसेवकांच्या मदतीने विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली.

# पारनेरमध्ये महात्मा फुले समता परिषदेची आढावा बैठक संपन्न

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) :** अखिल भारतीय पारनेर तालुक्यातील ओबीसी संघटनांचे पदाधिकारी व समता सैनिकांची महात्मा फुले समता परिषद आढावा बैठक पारनेर शहरातील शासकीय विश्रामगृह येथे समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुभाषराव लोंढे यांच्या अध्यक्षतेत संपन्न झाली. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किसनराव रासकर, बबनराव चौरे, समता परिषदेचे पारनेर तालुका अध्यक्ष नवनाथ खामकर, बबनराव घुमटकर, पत्रकार वसंत रांधवण, अनिल गाडिलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.



## गाव तिथे समता परिषदेची शाखा स्थापन करण्याचा निर्धार

यावेळी पारनेर तालुका अध्यक्ष नवनाथ खामकर यांनी गाव तिथे समता परिषद घर तेथे समता सैनिक अशी संकल्पना राबवून सर्व पदाधिकाऱ्यांनी एकमेकांशी समन्वय साधण्याचे आवाहन केले व लवकरच तालुक्यात गावानिहाय समता परिषदेचे आढावे घेण्यात येणार असल्याचे सुतोवाच सुद्धा खामकर यांनी केले. तर जिल्हाध्यक्ष सुभाषराव लोंढे यांनी समता संघटनेतील पदाधिकाऱ्यांच्या अडचणी सोडवून ओबीसींच्या लढ्याला बळकटी देण्यासाठी भुजबळ यांच्याकडे मागणी करणार असल्याचे सांगितले.

या बैठकीत उपस्थित पदाधिकाऱ्यांशी विविध विषयांवर सखोल संवाद साधत, संघटनेच्या भविष्यातील वाटचालीबाबत मते जाणून घेतली. समता, सामाजिक न्याय आणि संघटन बळकटीकरणाच्या दिशेने निर्धार अधिक दृढ करावा, तसेच ओबीसी समाजाच्या हक्कांच्या लढ्याला अधिक बळकटी देण्यासाठी व संघटनेचे कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी, प्रत्येक समतासैनिकाने जबाबदारीने आणि झोकून देऊन काम करण्याच्या सूचना यावेळी दिल्या.

या बैठकीत ओबीसी संघटनाचे पदाधिकारी व समतासैनिकांकडून आलेल्या सखोल, मार्गदर्शक आणि रचनात्मक सूचना हे संघटनेच्या भविष्याचा मार्ग उजळवणारे आहेत. या सूचनांचा योग्य अभ्यास करून त्यांचा अंमल करण्यात येईल. याची खात्री ही यावेळी देण्यात आली.

यावेळी संदिप रासकर, संतोष खाडे, किरण जमदाडे, विशाल क्षीरसागर, आर्यन शिंदे, तन्मय खामकर, संतोष खामकर, हनुमंत खामकर, प्रभाकर घोलप, विजय मंडलिक, बाळासाहेब मंडलिक, अशोक खामकर, आबासाहेब खामकर, रामदास खामकर, रामदास खामकर,आकेश जमदाडे, किशोर मेहेर, यश रसाळ, धनंजय मेहेर, तात्याभाऊ मेहेर, दत्तात्रय जमदाडे, निखिल जमदाडे, अविनाश लोखंडे, गणेश नगरे, पोपट खेडकर, सुनील नगरे, कृष्णा तारडे,गोकूळ रासकर, बाळासाहेब रासकर, शंकर गरगटे, शंकर रासकर, जालिंदर नरड, गणेश व्यवहारे, गुलाबराव गायकवाड, पोपट रासकर आदिंसह पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यासह समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षक दिनानिमित्त आदिवासी विकास प्रकल्पातील गृहपालाचा सन्मान

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, घोडेगाव (पुणे) :** शिक्षक हा समाजाचा खरा शिल्पकार असून, तो शिकवता शिकवता विद्यार्थ्यांना आकाशाला गवसणी घालण्याची ताकद देतो, असे सांगत दिनांक ०५ सप्टेंबर शिक्षक दिनाच्या निमित्ताने प्रदीप देसाई प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव (ता.आंबेगाव, जि.पुणे) यांच्या वतीने प्रकल्पातील शासकीय वसतिगृह व आश्रमशाळांतील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षक, गृहपाल व कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती व महान तत्त्वज्ञ भारत रत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात



आलेल्या या विशेष उपक्रमात, सन २०२४-२५ मध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय काम करणाऱ्या मुख्याध्यापक, गृहपाल, अधिक्षक, स्त्री अधिक्षिका, तसेच प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची निवड करण्यात आली. निवड समितीच्या शिफारसीनुसार निवड झालेल्या सर्व गृहपाल यांचे येत्या १५ नोव्हेंबर २०२५ रोजी जनजाती गौरव दिन या दिवशी औपचारिकपणे सन्मानित करण्यात येणार आहे.

गृहपाल विभागात पुढील मानकरी निवडण्यात आले आहेत :

रेनुका जाधव (घोडेगाव), अर्चना पवार (हडपसर), पूनम घायाळ (कराड), संजीव तोगरे (मांजरी फार्म), संतोष निमगिरे (जुन्नर), उदय महाजन (कोरेगाव पार्क)

विशेष ठळक मध्ये उदय महाजन. कोरेगाव पार्क वसतिगृहाचे गृहपाल उदय महाजन यांची निवड विशेष कौतुकास्पद मानली जात आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीबरोबरच त्यांच्या चारित्र्य घडणीत व सर्वांगीण विकासात त्यांनी दिलेल्या योगदानामुळे त्यांचे कार्य ठळकपणे अधोरेखित झाले आहे. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मार्गदर्शन वसतिगृहातील विविध नाविन्य पूर्ण उपक्रम, शाळाबाह्य प्रोत्साहन कार्यक्रम आणि सामाजिक समरसता जपणाऱ्या कामामुळे महाजन यांची कामगिरी आदिवासी समाजात आदर्शवत ठरली आहे. या गौरवामुळे प्रकल्पातील सर्वच शिक्षक व गृहपाल वर्गात आनंदाची लहर पसरली असून, शिक्षकांचे कार्य हेच समाजाचे भविष्य घडवते हा संदेश पुन्हा अधोरेखित झाला आहे.

# चेंबर कर्नाटकर हायस्कूल, चेंबूर येथे इको-फ्रेंडली गणपती उत्सव संपन्न

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.०६, चेंबूर (मुंबई) :** चेंबूर येथील चेंबूर कर्नाटका हायस्कूल मध्ये इको-फ्रेंडली गणेश उत्सव उत्साहात संपन्न झाला. गणेश चतुर्थीच्या दिवशी बाप्पाची पूजा करून गणेश प्रदर्शनाचे उदघाटन प्रमुख पाहुण्याच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी चेंबूर कर्नाटक संघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. या प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी बनवलेल्या पर्यावरण पुरक गणपती बाप्पाच्या ५२० मुर्ती प्रदर्शनात मांडण्यात आल्या होत्या, तसेच विद्यार्थ्यांच्या मनातील बाप्पा चित्राच्या रुपात साकारून २५० चित्र प्रदर्शनात मांडण्यात आल्या होते. दि. २८ ऑगस्ट रोजी ऋतुराज मोरया यांना तज्ञ मागदर्शक म्हणून बोलावून पर्यावरण पुरक गणपती मुर्ती कशी बनवायची यांचे मार्गदशन विद्यार्थ्यांना त्यांनी केले.

सर्व सहभागी विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने शॅडो माती देण्यात आली होती. सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी सुंदर, आकर्षक, मनमोहक विविध बाप्पाची मुर्ती साकारून आपल्या आवडीच्या रंगात रंगविल्यात, स्वतःच्या कल्पनाशक्तीने सुंदर आकर्षक आणि पर्यावरणपूरक गणेश मूर्ती घडवल्या.

यावेळी शाळेच्या प्राचार्या डॉ. गीतांजली सालियन बोलतांना म्हणाले, विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी साकारलेल्या आकर्षक मातीच्या मूर्तिनी केवळ शाळा परिसर रंगतदार झाला नाही, तर पुढील पिढीमध्ये पर्यावरण संवर्धनाची बीजे रोवली गेली. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मुर्तीमुळे होणारे पाणी प्रदूषण, नद्यांमध्ये जलचरांवरील घातक परिणाम याबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर त्यांनी मार्गदर्शन केले, दहा दिवस शाळेच्या सभागृहात मोठ्या थाटात व मोठया उत्सवात प्रदर्शन भरवण्यात आले होते. सर्व विजयी स्पर्धकांना बक्षीस देऊन गौरवण्यात आले. अनंत चतुर्थीच्या पहिल्या दिवशी सर्व गणेशमुर्ती मिरवणूक काढून शाळेच्या जवळ असलेल्या आगरी समाज गणेश तलावात शाळेच्या लेझिम पथक, बँड वाजत गाजत मोठ्या उत्सवात सर्व गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. या उपक्रमामुळे मुलांमध्ये सर्जनशीलता विकास झाला नाही तर गणपती उत्सव हा आनंद सोहळा असतानाच तो पर्यावरण रक्षणाचा नवा संकल्प ही ठरू शकतो.

विद्यार्थ्यांनी या उत्सवातून घेतलेल्या हरित संदेश घराघरात पोहोचवण्याची ग्वाही शाळेचे कलाशिक्षक शीराम महाजन यांनी यावेळी बोलताना दिली. या गणेश उत्सवाचे आयोजन व नियोजन शाळेचे कलाशिक्षक शीराम महाजन व प्रमोद कुरणे यांनी खूप मेहनत करून केले होते.

# थोडक्यात

## विसर्जनाच्यावेळी हरवलेली लहान मुलगी वाहतूक पोलिसांनी केली सुखरूप पालकांच्या स्वाधीन

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०६, तुर्भे (नवी मुंबई) :** गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर तुर्भे (तलाव) परिसरात तैनात असलेल्या वाहतूक पोलिसांनी साडेतीन वर्षांच्या हरवलेल्या लहान मुलीला सुखरूप पालकांच्या ताब्यात देऊन मानवतेचे उदाहरण दिले. एपीएमसी वाहतूक शाखेतील पोलीस शिपाई अमोल गणपत नागरे (बकल क्र. ४०१०) आणि पोलीस शिपाई वैभव कुराडे हे बंदोबस्तादरम्यान वाहतूक नियमनाची जबाबदारी पार पाडत असताना त्यांना रडत असलेली एक लहान मुलगी आढळली. तिला विचारपूस केली असता ती काहीही स्पष्ट सांगू शकली नाही. पोलिसांनी तातडीने परिसरातील नागरिक व दुकानदारांकडे चौकशी केली, मात्र त्याबाबत कोणतीही माहिती मिळाली नाही. यानंतर पोलीस निरीक्षक शिवाजी भांडवलकर यांना कळवून त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी मुलीला समजावले व गोड बोलून तिच्या शाळा व राहत्या घराबाबत माहिती मिळवली. चौकशीदरम्यान ती मुलगी एका कुटुंबातील असल्याचे समोर आले. त्यानुसार सेक्टर २१, तुर्भे येथे पोलीस पोहोचले असता मुलीचे पालक हरवलेल्या लेकीच्या शोधात चिंतेत भटकताना आढळले. आवश्यक पडताळणी करून वाहतूक पोलिसांनी मुलीला त्यांच्या स्वाधीन केले. या प्रकरणी पोलीस शिपाई नागरे व कुराडे यांनी दाखवलेल्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्या कुटुंबियांनी आपल्या लाडक्या मुलीला सुरक्षित परत आणल्याबद्दल महाराष्ट्र पोलीस व एपीएमसी वाहतूक शाखेचे मनः पूर्वक आभार मानले.



## खंडाळा राष्ट्रीय कॉँग्रेसला नवे नेतृत्व तालुकाध्यक्षपदी डॉ.विजय शिंदेची वर्णी

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०७, खंडाळा (सातारा) :** शिरवळ येथे गुजरात मेडिकल इमारतीत नुकतीच खंडाळा तालुक्यातील राष्ट्रीय कॉँग्रेस कार्यकर्त्यांची तालुका राष्ट्रीय कॉँग्रेस अध्यक्ष निवडीबद्दल मिटींग झाली. या मिटींगसाठी जिल्हाध्यक्ष रणजित देशमुख उपस्थित होते. या मिटिंगमध्ये खंडाळा तालुका सहकारी साखर कारखाना संचालक चंद्रकांत ढमाळ यांनी डॉ. विजय शिंदे याचे नाव सुचविले त्यास माजी सभापती गुरूदेव बरदाडे चानी अनुमोदन दिले. यावेळेस जिल्हाध्यक्ष रणजित देशमुख, जेष्ठ कॉँग्रेस नेते एस. वाय.पवार, डॉ. विजय शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. नुतन तालुकाध्यक्ष डॉ.शिंदे यांचे मान्यवरांसाह उपस्थित कार्यकर्ते यांनी अभिनंदन करून भावी वाटचालीस त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच पक्षवाढीसाठी चर्चा झाली. अविनाश वाडकर यांनी आभार मानले. मिटींगसाठी रत्नकात भोसले संचालक खंडाळा तालुका शेतकरी सहकारी साखर कारखाना, महाराष्ट्र युवक कॉँग्रेसचे जयदीप शिंदे जोशी, शिवाजीराव देशमुख, नौशाद काझी, विलासराव आसलेकर, माणिक मणेर, फिरोज आत्तार, बजरंग सोनवणे, श्रीरंग कुंभार व कार्यकर्ते मोठ्या संख्येत उपस्थित होते.



## टाकळी ढोकेश्वर येथील सावतामाळी प्रतिष्ठानच्या बाप्पाला निरोप

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** टाकळी ढोकेश्वर परिसरात गेल्या अकरा दिवसांपासून सुरु असलेला गणेशोत्सव मंगलमय वातावरणात पार पडला. सावतामाळी प्रतिष्ठान व सावतामाळी मित्रमंडळाच्या पुढाकाराने माळी वस्ती येथे स्थापन करण्यात आलेल्या श्री गणेशाची विसर्जन मिरवणूक दिनांक ०६ सप्टेंबर २०२५ रोजी पारंपारिक ढोल-ताशांच्या गजरात आणि जल्लोषमय वातावरणात काढण्यात आली. पुरुषांसह महिलांनीही उत्साहात ठेका धरत गणरायाला निरोप दिला. विशेष म्हणजे या मिरवणुकीत सर्व धर्मीय एकत्र येत धार्मिक सौहार्दाचे आणि एकात्मतेचे दर्शन घडविले. गणेशोत्सवाच्या अकरा दिवसांत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सत्यनारायण महापूजेनंतर मिरवणुकीला प्रारंभ झाला. पारंपरिक वाद्यांच्या गजरात महिला वर्गाने सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत सोहळ्याची शोभा वाढविली.




मिरवणुकी दरम्यान गणेश भक्तांनी गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या! अशा घोषणा देत वातावरण दुमदुमविले. पारंपारिक ढोल-ताशांच्या निनादात, गुलालाच्या उधळणीत व गाण्यांच्या तालावर तरुणांनी ठेका धारला होता. यावेळी शेकडो कार्यकर्त्यांनी मिरवणुकीत सहभाग नोंदविला. मोठ्या जल्लोषात पार पडलेल्या मिरवणुकीनंतर गणरायाचे काळू तलावात विसर्जन करण्यात आले. बाप्पाला निरोप देताना मंडळाच्या सदस्यांच्या डोळ्यात भावुकता तर ओठांवर पुढच्या वर्षी लवकर या! चा गजर होता.

## प्रकाश गाजरे यांना राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०७, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्याच्या उत्तर भागातील आदिवासी पट्ट्यातील म्हसोबा झाप ग्रामपंचायतचे सरपंच प्रकाश तुकाराम गाजरे यांना राज्यस्तरीय ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेतर्फे 'आदर्श सरपंच पुरस्कार' प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार ग्रामीण भागात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सरपंचांना दिला जातो. पुरस्कार वितरण समारंभात माजी कुलगुरू डॉ. एस. बी. निमसे, माजी सभापती डॉ. वंदनाताई मुरकुटे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र फाळके आणि प्राचार्य डॉ. कुंडलिकराव शिंदे यांच्या हस्ते हा सन्मान देण्यात आला. पुरस्कार सोहळ्याला सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग आहेर, अरुण बेलकर, कृष्णाजी गाजरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या सन्मानामुळे पारनेर तालुक्यातील आदिवासी पट्ट्यातील ग्रामीण विकासाच्या कार्याला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. सरपंच प्रकाश गाजरे यांनी पुरस्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त करत गावाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. हा पुरस्कार केवळ त्यांचा नव्हे, तर संपूर्ण म्हसोबा झाप गावाचा सन्मान असल्याचे त्यांनी नमूद केले.

